# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ७६ /२०२०** **दिनांक २२ /०९ /२०२०** **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६ /०९ /२०२० ते २२/०९ /२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२ /०९ /२०२० सकाळी ८:३० पासून २७ /०९ /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/०९ | १७/०९ | १८/०९ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२ /०९ | | २३ /०९ | २४/०९ | २५ /०९ | २६ /०९ | २७ /०९ |
| २.६ | ६.२ | ९.४ | १६.४ | १४.४ | ०.० | ८.६ | पाऊस (मिमी) | २४ | १२० | २७ | १५ | 03 |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३१ | ३१ | ३१ | 32 |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ८ | ६ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९५ | ९७ | ९७ | ९४ | ९३ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ८६ | ८६ | ८३ | ७२ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ८ | ६ | ७ | ७ |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा | द. | द. | आ. | आ. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ५७.६ | २९२८.६ | ४२३३.४ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक २३ ते २७ सप्टेंबर २०२० दरम्यान मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

**इशारा : दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २६ आणि २७ सप्टेंबर रोजी हलका पाऊस होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | | • दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी करू नये, कापणी केलेली असेल तर ते लगेच सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी.<br>• दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने किटक नाशकांची फवारणी व खते देणे पुढे ढकलावे. |
| **भात** | **पोटरी ते काढणी अवस्था** | • दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी करू नये, कापणी केलेली असेल तर ते लगेच सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी.<br>• पुढील पाच दिवस मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता, गरवे भात पोटरी अवस्थेत असल्याने तसेच निम गरवे भात फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी तसेच हळवे भात दाणे भरणेच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी. भात खाचरातील बांध तणमुक्त ठेवावेत जेणेकरून किडींच्या खाद्य वनस्पतीचा समूळ नायनाट केल्याने भात पिकावर किडींचा प्रादुर्भावावर आळा घालण्यास मदत होईल.<br>• पावसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे भात पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पाण्यात मिसळणार भुकटी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **नाचणी** | **पोटरी अवस्था** | • पुढील पाच दिवस पावसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे भात पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पाण्यात मिसळणार भुकटी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी. |
| **चिकू** | **फळ धारणा** | • दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने चिकूच्या बागेत पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी झाडांच्या दोन ओळीमध्ये जमीनीच्या उतारानुसार चर काढावा व झाडाच्या खोडाजवळ मातीची भर द्यावी. तसेच गळालेली फळे पालापाचोळा गोळा करून नष्ट करावा व बागेत स्वच्छता ठेवावी जेणेकरून रोगकारक बुरशीचा प्रादुर्भाव वाढणार नाही. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता द्यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २ /५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत. नारळ बागेतील वाळलेल्या झावळ्या गोळा करून नष्ट करून बागेची साफसफाई करावी आणि नंतर खताची मात्रा २४ सप्टेंबर नंतर द्यावी. |
| **फळबाग रोपवाटिका** | **वाढीची अवस्था** | • दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा, चिकू, काजू, नारळ व सुपारी फळबागेत पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाणांची पेरणी २४ सप्टेंबर नंतर करावी. |
| **पशुधन** | | • दिनांक २४ सप्टेंबर रोजी बहुतेक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने सुरक्षित गोठयामध्ये बांधण्याची व्यवस्था करावी तसेच पावसाचे पाणी गोठ्यामध्ये साचणार नाही याची काळजी घ्यावी. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.** | | |